**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर **P.S.(ठाणे):** वेदांत नगर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0178 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**02/10/2025 02:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 01/10/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/10/2025
**Time From (वेळेपासून):** 15:50 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 02/10/2025 **Time (वेळ):** 01:46 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/10/2025 01:46 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** व्यवसाय कर कार्यालय,जीएसटी भवन , रेल्वे स्टेशन समो,छत्रपती संभाजी नगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): पोलीस निरीक्षक -वाल्मीक निंबा कोरे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शिल्पतेजस अपार्टमेंट,ज्ञानेश्वर नगर, गारखेडा,छत्रपती संभाजीनगर,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शिल्पतेजस अपार्टमेंट,ज्ञानेश्वर नगर, गारखेडा,छत्रपती संभाजीनगर,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9623565310

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुरेश दादाराव जाधव | | | 1. हनुमाननगर, गल्ली नं 1,छत्रपती संभाजीनगर ,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | दुर्गादास धोंडीराम जाधव | | | 1. कोकणवाडी,अहिल्याबाई होळकर चौक, छत्रपती संभाजीनगर,वेदांत नगर,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. Inquest Report / U.D. case No., if any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दि. 02/10/2025

मी वाल्मीक निंबा कोरे वय 39 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर रा. शिल्पतेजस अपार्टमेंट, ज्ञानेश्वर नगर, गारखेडा, छत्रपती संभाजीनगर मो नं. 9623565310

मी दिनांक 01/10/2025 रोजी ला.प्र.वि. कार्यालय, छत्रपती संभाजीनगर कार्यालयात हजर असताना, मला मा. पोलीस अधिक्षक यांनी त्यांचे कक्षात बोलावुन घेवुन समक्ष हजर असलेले तक्रारदार विशाल सुनिल काळे वय 36 वर्षे रा. रांजणगाव शे.पु. ता. गंगापुर ता. छत्रपती संभाजीनगर यांची ओळख करुन देवुन, त्यांची लाचे संदर्भात तक्रार असल्याचे सांगुन त्यांचे तक्रारीवर कारवाई करणेसाठी पंच उपलब्ध करुन घेवुन पुढील कारवाई करणेबाबत आम्हास तोंडी आदेश दिला. त्यावेळी आम्ही सदर तक्रारदार यांनी त्यांची तक्रार विचारली असता, त्यांनी थोडक्यात हकिगत सांगीतली की, माझे मुळ गावी रांजणगाव शे.पु. या ठिकाणी दिवाळीसाठी दरवर्षी माझ्या गावात आणी सिडको-1 छत्रपती संभाजीनगर या भागात माझे सहीत मित्रांचे फटाका स्टॉल लावत असतो. मी माझ्या मित्रांच्या सहीत 30 फटाका स्टॉल लावण्यासाठी आवश्यक व्यवसाय कर विभागाची ना हरकत प्रमाणपत्रा करीता रुपये 1100/- चे शासकीय चलनाचा ऑनलाईन भरणा करुन चलान प्राप्त करुन घेतले होते. मी सदरचे चलान घेवुन ना हरकत प्रमाणपत्र घेण्यासाठी दिनांक 28/09/2025 रोजी व्यवसाय कर कार्यालय, जीएसटी भवन, रेल्वे स्टेशन समोर छत्रपती संभाजी नगर हया ठिकाणी जावुन श्री सुरेश जाधव साहेब यांची भेट घेतली. सदर भेटीत मी ना हरकत प्रमाणपत्रा बाबत चर्चा केली असता शासकीय चलनाच्या व्यतिरिक्त प्रत्येक चलनामागे जादा पैसे दिल्या नंतरच ना हरकत प्रमाणपत्र अदा करणार असल्याचे श्री सुरेश जाधव साहेब यांनी मला सांगितले. मला श्री सुरेश जाधव साहेब यांना शासकीय चलनाच्या शिवाय जादा पैसे देण्याची इच्छा नसल्याने मी त्यांच्या विरोधात लाच मागणी बाबत तक्रार करण्यास ला.प्र.वि. कार्यालयात हजर झालो. मी दिनांक 01/10/2025 रोजी व्यवसाय कर कार्यालय, जीएसटी भवन, रेल्वे स्टेशन समोर छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी जावुन श्री सुरेश जाधव साहेब यांची भेट घेवुन फटाका स्टॉलच्या ना हरकत प्रमाणपत्रा बाबत चर्चा करणार आहे. सदर चर्चेत श्री सुरेश जाधव साहेब यांनी किंवा त्यांच्या वतीने आणखी इतर कोणी इसमाने पैशाची मागणी केल्यास त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करावी.

माझ्यात व जाधव साहेब यांचे दरम्यान कोणताही आर्थीक देवाण घेवाणीचा व्यवहार नाही. तसेच आमच्या दरम्यान कोणताही वाद अगर पुर्ववैमनस्य नाही. मी तक्रारी सोबत ना हरकत प्रमाण पत्र मिळण्यासाठी आवश्यक शासकीय चलनाच्या प्रती सादर करीत आहे.

त्यावेळी तक्रारदार काळे यांनी ते सुरेश जाधव, व्यवसाय कर अधिकारी, वस्तु व सेवा कर कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांना दि. 01/10/2025 रोजी त्यांचे शासकीय कार्यालयात भेटण्यास जाणार असल्याचे सांगीतले. त्यावेळी मी लागलीच महानगरपालीका कार्यालय, वॉर्ड क्रं.06 छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयातुन लेखी पत्र देवुन दोन शासकीय पंच बोलावुन घेतले. त्यावेळी मी तक्रारदार श्री विशाल काळे यांना स्टाफ, शासकीय पंच यांचेशी ओळख करुन दिली. मी सर्वांना तक्रारीची पडताळणी ला.प्र.वि. कार्यालय छत्रपती संभाजीनगर या कार्यालयातुन करणार आहोत असे सांगीतले. त्यानंतर माझे सुचनेवरुन तक्रारदार श्री काळे यांनी त्यांची तक्रार पंचांना सांगीतली. श्री. काळे यांनी सांगीतलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी व पंचांनी तक्रारी अर्जावर सहया केल्या. तक्रारीचे अनुषंगाने तक्रारदार श्री. काळे व पंच क्रं. 1 यांचेसह श्री. सुरेश जाधव, व्यावसाय कर अधिकारी,

वस्तु व सेवा कर कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयात पाठवुन तक्रारदार श्री काळे यांचे तक्रारीप्रमाणे व्यावसाय कर अधिकारी सुरेश जाधव हे लाचेची मागणी करतात अगर करे ? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगुन, पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. तसेच शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन त्यामध्ये SanDisk कंपनीचे 16 जीबी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड पंचांचे समक्ष घालुन, व्हाईस रेकॉर्डरचे फोल्डरमध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनीमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार काळे व पंचांची खात्री करुन दिली. तसेच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु बंद करण्याचे प्रात्याक्षीक दाखवले. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 15.50 वा. चालु करुन, तो तक्रारदार काळे यांचे गळयात दोऱ्याचे सहाय्याने अडकवुन तक्रारदार काळे व पंच नं. 01 यांना सुरेश जाधव , व्यावसाय कर अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार यांची स्वत:ची बजाज पल्सर कंपनीची मोटार सायकल क्र एम एच 20 ई आर 5246 वरुन जाधव यांचे कार्यालयात त्यांची भेट घेण्याकरीता पाठविले. तक्रारदार व पंच क्रं 1 जाधव असे सुरेश जाधव , व्यावसाय कर अधिकारी यांची त्यांचे कार्यालयात जावुन , कामासंदर्भात भेटुन पुन्हा आम्ही थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी परत आले. त्यानंतर तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढुन 16.10 वाजता बंद केला.

आम्ही प्रथम पंच क्रं. 1 यांना सुरेश जाधव, व्यावसाय कर अधिकारी यांना भेटण्यास गेल्यानंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी सांगीतले की, ते तक्रारदार काळे यांचे सोबत सुरेश जाधव यांचे शासकिय कार्यालयात गेलो. मी तक्रारदार यांचेसोबत जाधव साहेब यांचे कक्षात गेलो असता तक्रारदार यांनी त्यांच्यासह मित्रांच्या 30 फटाका स्टॉलच्या ना हरकत प्रमाणपत्रांच्या संदर्भात चर्चा केली. सदर चर्चेत सुरेश जाधव यांनी एका ना हरकत प्रमाण पत्रासाठी 300 रुपयांची मागणी करुन तडजोडी अंती 250/- रुपये या प्रमाणे असे 30 ना हरकत प्रमाणपत्रांचे 7,500/-रुपये स्विकारण्याची कबुल केले. त्यांनतर त्यांनी तक्रारदारास लाच रक्कम घेवुन येण्यास सांगितले असता तक्रारदाराने त्यास होकार देवुन आम्ही कार्यालयातुन बाहेर आलो. त्यानंतर आम्ही तक्रारदार काळे यांना व्हाईस रेकॉर्डर चालु करुन सुरेश जाधव यांची भेट घेतल्यापासुन ते पुन्हा सुरक्षीत स्थळी माघारी येईपर्यंत काय हकीकत घडली याबाबत विचारले असता त्यांनी देखील पंच क्रं. 1 यांचे प्रमाणे हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉडर चालु करुन त्यामधील कैद तक्रारदार आणी श्री सुरेश जाधव यांच्या दरम्यान झालेले संभाषण ऐकले असता तीस, त्यांचे बी फटाक्याचे दुकान आहे ना.., किती सांगितले होते पैसे, काय आहे सांगा पटकन सांगा काय आहे तुम्ही सांगा दरवेळेस कायल उगच किर-किर करायची सांगा पटकन जाउदया हे आपुन मागच्या वर्षी दिलते यावर्षी हे वाढुन घ्या... संपला विषय.., तीनशे रुपये घेवुन राहिलो आपुन सगळयांकडुन, तीनशे, हंम्म, काय करायचं होत.. सांगाना, आता जे है ते है त्यात काय वेगळे है का त्यात.. तुमच्या एकटयासाठी थोडी काही वेगळ असंन त्यात पन्नास कमी दया भो.. तुम्ही अजुन काय सांगाव भो तुम्हाला, अडीच शे.. तुमच्यासाठी, हां.. मला उदया बाहेर जायचं आहे.. लवकर आं, कोनाला काही देऊ नका, अडीचशे ने मला दया मी निपटुन घेतो.. सगळं बर का.., झालं .. झालं.. पाचं मिनटं.. लागतीन अजुन असे अभिकथीत लोकसेवक सुरेश जाधव तक्रारदाराकडे संभाषणामधुन लाच मागणी करीत आहे या वरुन आलोसे श्री सुरेश जाधव यांनी ना हरकत प्रमाणपत्रा करीता 7500/ रुपये लाचेची मागणी करुन लागलीच स्विकारण्याचे कबुल केल्याचे निष्पन्न झाले. आम्ही तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे व सुरेश जाधव, व्यावसाय कर अधिकारी यांनी केलेल्या लाचमागणीच्या अनुषंगाने सापळा कारवाई सुरु केली.

त्यानंतर तक्रारदार काळे यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी काळे यांनी त्यांचेकडील 500/- रुपये दराच्या 15 भारतीय चलनी नोटा अशी 7,500/- रुपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार काळे व पंचांना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्या चे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी असलेबाबत खात्री करुन दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळापुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अँथ्रासिन पावडर लावलेले 7,500/- रुपये तक्रारदार काळे यांचे शर्टचे डाव्या बाजुचे छातीवरील खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार काळे, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना देवुन, सुरेश जाधव, व्यावसाय कर अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्यांनी त्यांचे डोळयावर लावलेला चष्मा काढुन डोक्यावर लावण्याचा इशारा करण्याचा सुचना दिल्या. त्यानंतर पंचांसमक्ष पुन्हा सापळा कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर मध्ये SanDisk कंपनीचे 16 जीबी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड घालुन 16.25 वा चालु करुन तो तक्रारदार काळे यांचे गळयात अडकवुन तक्रारदार काळे व पंच क्रं 1 यांना सापळा कारवाईकामी तक्रारदार याचे स्वत:कडील मोटार सायकलवरुन सुरेश जाधव, व्यवसाय कर अधिकारी यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. त्यांचे पाठोपाठ मी सोबत पंच क्रं. 2 व सापळा पथक असे आमचेकडील खाजगी वाहनाने वस्तु व सेवा कर कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे आडोशाला जावुन तक्रारदार नजरेत राहील अशा रितीने थांबलो. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं.1 हे सुरेश जाधव यांची भेट घेण्यासाठी त्यांचे कार्यालयातील पहील्या मजल्यावर असलेल्या कक्षात जाताना

त्यानंतर तक्रारदार हे सुरेश जाधव यांची भेट घेवुन त्यांचे कार्यालयातुन खाली तळमजल्या समोर येवुन दिसली. पथकास दिसेल अशारितीने त्यांनी त्यांचे डोळयावरील चष्मा काढुन डोक्याचे वर लावुन अभिकथीत लोकसेवक याने पैसे स्विकारल्याचा 17.40 वा नियोजीत इशारा केला. सदर इशारा समजुन आम्ही, पंच क्रं. 2 व सापळा पथक सक्रिय होवुन आम्ही खाली आलेल्या तक्रारदारास सोबत घेवुन सुरेश जाधव, व्यावसाय कर अधिकारी यांचे पहील्या मजल्यावरील कार्यालयात गेलो. त्यानंतर लागलीच तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर बंद केले. तसेच कार्यालयातील सुरेश जाधव व त्याचे कार्यालयातील इतर व्यक्तींना आहे त्याच स्थितीत थांबण्यास सांगीतले. त्यानंतर आम्ही सर्व सापळा पथक, तक्रारदार व पंच क्रं. 2 यांचेसमक्ष पंच क्रं. 1 यास सुरक्षीत ठिकाणावरुन निघाल्यापासुन ते नियोजीत इशारा होईपर्यंत काय घडले याबाबत विचारले असता, पंच क्रं. 1 याने सांगीतले की, मी व तक्रारदार असे सुरेश जाधव यांची भेट घेतली. त्यानंतर तक्रारदार काळे यांनी सुरेश जाधव यांना कामासंदर्भात चर्चा केली. त्यानंतर सुरेश जाधव यांनी पैशाबाबत विचारुन लाचेची रक्कम बाहेर बसलेल्या त्यांचे कार्यालयातील व्यक्तीकडे देण्यास सांगीतले. सदरची लाच रक्कम त्या इसमास देवुन मी व तक्रारदार असे कार्यालयाच्या खाली येवुन तक्रारदाराने नियोजीत इशारा केला. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना विचारणा केली असता त्यांनी देखील पंच क्र 1 यांनी दिलेल्या माहिती प्रमाणेच वरीलप्रमाणे हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हाईस रेर्काडर चालु करुन त्यामधील कैद तक्रारदार, श्री सुरेश जाधव आणि श्री दुर्गादास जाधव यांच्या दरम्यान झालेले संभाषण ऐकले असता झाल का, हे पंधरा आहे आणि हे माझ्या मित्राचे पंधरा, आता जेवढ तयार झालय तेवढ देतो तुम्हाला, तुम्ही मला म्हटले असते ना तर मी प्रिंट काढुन ठेवल्या असत्या मी तेव्हा, जाधव साहेब म्हणंटले अडीचशे रुपये ने, ऐ भय्या चेक करुन घे पहिले तुझ्या सर्व एन ओ स्या तुमच्या, नाही नाही देवुन टाका पैसे, माझ्याकडं द्या, असे झालेल्या संभाषणामध्ये लाचमागणीची रक्कम स्विकारलेली आहे या वरुन आलोसे श्री सुरेश जाधव यांचे सांगण्यावरुन ना हरकत प्रमाणपत्रा करीता 7500/ रुपये लाच रक्कम अभिकथीत लोकसेवक दुर्गादास जाधव यांनी स्विकारल्याचे निष्पन्न झाले.

CCtNS प्रणाली मध्ये कमाल 8000 अक्षरांची मर्यादा असल्याने उर्वरित फिर्याद FIR सोबत जोडलेली आहे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

PRAVINA TARACHAND YADAV(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (लां तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): PRAVINA TARACHAN
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन,वेदांतनगर
छत्रपती संभाजीनगर (शहर)

आम्ही पंचासमक्ष व्यावसाय कर कार्यालयातील खुर्चीवर बसलेल्या इसमास त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री सुरेश दादाराव जाधव वय 53 वर्षे पद- व्यावसाय कर अधिकारी, छत्रपती संभाजीनगर रा. हनुमाननगर, गल्ली नं. 1 छत्रपती संभाजीनगर असे असल्याचे सांगीतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख करुन देवुन लाचेची रक्कम कोठे ठेवली याबाबत विचारले असता त्यांनी सांगीतले की, मी लाचेची रक्कम माझ्या कार्यालयातील सहकारी दुर्गादास जाधव यास स्विकारण्यास सांगीतले होते. तेव्हा आम्ही त्यांचे कार्यालयात हजर असणारा दुसरा इसमास नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव दुर्गादास धोंडीराम जाधव वय 39 वर्षे, पद नोकरी, कर सहाय्यक , रा. कोकणवाडी, अहिल्याबाई होळकर चौक, छत्रपती संभाजीनगर असे सांगुन त्यास आम्ही लाच रक्कम कोठे ठेवली याबाबत विचारले असता त्याने सांगीतले की, तक्रारदार काळे यांनी जाधव साहेबांचे सुचनेप्रमाणे लाचेची रक्कम रुपये 7,500/- माझ्याकडे दिल्यानंतर ती मी प्रथम पॅण्टचे डाव्या खिशात व त्यानंतर शर्टचे खिशात ठेवल्याचे सांगीतले. तेव्हा सदरची लाचेची रक्कम पंच क्रं.2 यांचे मार्फतीने ताब्यात घेवुन सापळा पुर्व कारवाईवेळी तक्रारदार याचे कडे दिलेल्या नोटांशी खात्री करता त्या त्याच असल्याचे दिसुन आले. तसेच पंचासमक्ष अल्ट्रा व्हॉयलेट प्रकाशाचे उजेडात दुर्गादास जाधव यांचे हात, पॅण्ट व शर्ट तपासला असता त्यावर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. सदरची लाचेची रक्कम, अभिकतीत लोकसेवक यांचे अंगझडतीत मिळुन आलेली रोख रक्कम व मोबाईल तसेच तक्रारदार याचे 30 फटाका स्टॉलचे परवान्याचे नाहरकत प्रमाणपत्र पंचासमक्ष जप्त केले. तसेच अभिकतीत लोकसेवक सुरेश जाधव व दुर्गादास जाधव यांना ताब्यात घेवुन त्यानंतर पुढील कारवाईकामी ला.प्र.वि. कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे येवुन पंचनामा करुन पुर्ण केली आहे.

तरी दि. 01/10/2025 रोजी 15.50 वा ते 17.40 वा दरम्यान व्यवसाय कर कार्यालय, जीएसटी भवन, रेल्वे स्टेशन समोर छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी यातील मुळ तक्रारदार विशाल सुनिल काळे रा. रांजणगाव शे.पु. ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर यांचे स्वत:सह मित्रांचे फटाका स्टॉलचे 30 ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी अभिकथीत लोकसेवक श्री सुरेश दादाराव जाधव वय 53 वर्षे व्यवसाय- व्यावसाय कर अधिकारी, छत्रपती संभाजीनगर रा. हनुमाननगर, गल्ली नं. 1 छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांचेकडुन शासकीय चलनाच्या व्यतिरिक्त प्रत्येकी 300/ रुपयाची मागणी करुन तडजोडी अंती 250/- रुपये या प्रमाणे 7,500/- रुपयांची लाचमागणी केली. सदरची लाच रक्कम अभिकथीत लोकसेवक श्री सुरेश दादाराव जाधव यांच्या सांगण्या वरुन अभिकथीत लोकसेवक श्री दुर्गादास धोंडीराम जाधव, पद- कर सहाय्यक, रा. कोकणवाडी, अहिल्याबाई होळकर चौक, छत्रपती संभाजीनगर यांनी स्विकारली आहे. सबब अभिकथीत लोकसेवक श्री सुरेश दादाराव जाधव आणी श्री दुर्गादास धोंडीराम जाधव यांच्या विरोधात माझी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 चे कलम 7, 12 प्रमाणे सरकार तर्फे कायदेशिर फिर्याद आहे.

माझा फिर्यादी जबाब मी संगणकावर टंकलिखीत केलेला असुन, तो मी वाचुन पाहीला असता बरोबर व खरा आहे.

PI Vaiwik kale

समक्ष

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन,वेदांतनगर
छत्रपती संभाजीनगर (शहर)